महाराष्ट्र शासन
**पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,**
मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर-431001.
दुरध्वनी क्रमांक 0240-2240591,फॅक्स क्र.0240-2240596
ई मेल :- cp.aurangabad@mahapolice.gov.in

क्र.कक्ष-१०/पो.शि/भरती-प्रेसनोट/२०२४/ छत्रपती संभाजीनगर, दिनांक ०२.०७.२०२४

# प्रेस नोट

कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवरील ३१५ रिक्त कारागृह शिपाई पदांकरीता दि. २८.०६.२०२४ ते ०१.०८.२०२४ या कालावधीत सकाळी ५.०० वाजेपासुन विभागीय क्रिडा संकुल, सुतगिरणी चौक, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर या मैदानावर शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी ची प्रक्रिया चालु आहे.

दि.२८.६.२०२४ ते ०२.७.२०२४ रोजी शारिरिक मोजमाप व मैदानी चाचणी करीता बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| दिनांक | एकुण बोलविलेले उमेदवार | हजर उमेदवार | इतर कारणामुळे शा.मोजमाप व मैदानी चाचणी करण्यास ईच्छुक नसलेले उमेदवार | छाती उंची मध्ये अपात्र उमेदवार | एकुण गैरहजर उमेदवार | मैदानी चाचणी करिता पात्र उमेदवार |
|---|---|---|---|---|---|---|
| दि. २८.६.२०२४ ते दि. १.७.२०२४ | ७५०० | ४९८६ | ३६ | ३०० | २५३८ | ४६६० |
| २.७.२०२४ | २५०० | १६२० | ११ | ८० | ८८६ | १५२९ |
| एकुण | १०००० | ६६०६ | ४७ | ३८० | ३४२४ | ६१८९ |

पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवर रिक्त असलेली २१२ पोलीस शिपाई पदा करिता आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचे शारीरीक मोजमाप व मैदानी चाचणी दिनांक १९ जुन २०२४ ते २६.६.२०२४ या कालावधीत विभागीय क्रिडा संकुल, सुतगिरणी चौक, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर या मैदानावर पार पडली आहे. सदर मैदानी चाचणीमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे जाहिरातीमधील रिक्त पदाचे १:१० प्रमाणात लेखी परीक्षेकरिता **(२२२८)** पात्र ठरलेल्या उमेदवारांची सामाजिक व समांतर आरक्षणासह गुणांची यादी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या उमेदवारांची पोलीस शिपाई पदाची लेखी परिक्षा हि दि. ७.७.२०२४ रोजी १५.०० वाजता खालील ठिकाणी घेण्यात येणार आहे.

**राम नवले यांचे गुरुमाऊली वेअर हाऊस,**
**गट नं. १२९, करोडी टोकलनाका, ओम-साई हॉटेलचे मागे,**
**सोलापुर-धुळे राष्ट्रीय महामार्ग-२११, छत्रपती संभाजीनगर.**

उमेदवारांना लेखी परिक्षेकरिता या कार्यालयाकडुन परिक्षा पॅड व ब्लॅक बॉल पेन पुरविण्यात येणार आहे. उमेदवारांनी परिक्षेकरिता येतांना सोबत प्रवेशपत्र व आवेदन अर्ज घेवुन यावे. इतर कोणतेही किंमती वस्तु कॅक्युलेटर, स्मार्टवॉच, मोबाईल फोन, हेडफोन, ब्ल्युटुथ-हेडफोन व इतर इलेक्ट्रॉनिक वस्तु सोबत बाळगु नये. उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी वर नमुद ठिकाणी दि. ७.७.२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता येणे आवश्यक राहील.

लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी कांही उमेदवार यांनी अनुसूचित जाती (SC), विमुक्त भटक्या जमाती (VJA), भटक्या जमाती-ब (NTB), भटक्या जमाती-क (NTC), भटक्या जमाती-ड (NTD), या प्रवर्गाच्या जागा रिक्त नसतानाही त्यांनी त्यांचे मुळ प्रवर्गातुन आवेदन अर्ज केलेले आहेत. त्यांना अराखिव प्रवर्गाचे अटी व शर्तीचे अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात अराखिव प्रवर्गातुन प्रवेश दिलेला आहे. त्यांना तसे लेखी परिक्षेपुर्वी बंधपत्र देणे आवश्यक आहे. बंधपत्र न दिल्यास त्यांना भरती प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच उमेदवारांना शारीरिक चाचणी व लेखी परीक्षेमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे कागदपत्रांच्या पडताळणीच्या अधिन राहुन तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदानुसार कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहुन तात्पुरती निवड यादी/प्रतिक्षा यादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करुन प्रसिध्द करण्यात येईल. कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचाच अंतिम निवडसुची/प्रतिक्षासुची मध्ये समावेश करण्यात येईल. कागदपत्रे तपासणीमध्ये उमेदवाराकडे जाहिरातीत दर्शविल्या प्रमाणे कागदपत्रे उपलब्ध नसल्यास पोलीस शिपाई भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर त्यांना अपात्र करण्यात येईल.

( शिलवंत नांदेडकर )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर.